|| जनसेवा हीच ईश्वरसेवा ||

स्वामी शामानंद एज्युकेशन सोसायटीचे

# स्वामी शामानंद हायस्कूल शिशु विभाग

(मराठी / सेमी इंग्रजी माध्यम)

बर्वेनगर नगर, भटवाडी (पश्चिम), मुंबई-४०० ०८४

इयत्ता - छोटा शिशु




# शालेय दैनंदिनी २०२०-२०२१

## ब्रीद वाक्य (Motto)

**प्रज्वलितो ज्ञानमयोदीप:**

**अर्थ – ज्ञानरुपी दिवा अखंड प्रकाशित करणे.**

## आमचे जीवित कार्य -Mission

शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक आणि
राष्ट्रीय स्पंदने विकसित करणे.

## आमची दूरदृष्टी-Vision

ज्ञान-तंत्रज्ञानाच्या आधारे बहुजन व वंचित समाजातील विद्यार्थ्यांना मूल्याधिष्ठीत
शिक्षण देणारी ज्ञानप्रवर्तक संस्था बनणे

## आमची उद्दिष्टे- Goals

1. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी त्यांची वर्तणूक आणि चारित्र्य यांमधून प्रतिबिंबित होईल असे ज्ञान त्यांना देऊन जीवनातील आव्हाने पेलण्याची क्षमता त्यांच्यात निर्माण करणे.

2. विद्यार्थ्यांमध्ये भावप्रज्ञा, संघभावना, नेतृत्वगुण, राष्ट्रीय एकात्मता विकसित करून सर्जनशीलता आणि विश्लेषणात्मक कौशल्य यांचे एकत्रीकरण असलेले शैक्षणिक कार्यक्रम देणे.

3. सर्वधर्म सहिष्णुता, सर्व भाषांप्रती सन्मान व पर्यावरणप्रेम इ.विषयांद्वारे आंतरराष्ट्रीय सलोख्याची बीजे तळागाळातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवून सर्वसमावेशक शिक्षणाची गुणवैशिष्टये जोपासणे.

4. जागतिकीकरणाच्या दृष्टीकोनातून मूल्याधिष्ठीत शिक्षणाची जोपासना करणे, दुर्बल घटकांसाठी आर्थिक मदतीचा हात पुढे करून शिक्षण प्रवाह अखंडीत ठेवणे.

# स्वामी शामानंद एज्युकेशन सोसायटीचे

## स्वामी शामानंद हायस्कूल

### दर्जेदार व संस्कारक्षम शिक्षणाची हमी

बर्वेनगर नगर, भटवाडी (पश्चिम), मुंबई-४०० ०८४

ईमेल :swamishamanand.principal@gmail.com दूरध्वनी क्र : २५१५४७५७५


## शाळेविषयी महत्वाचे :



सन १९४८ ते १९४९ मध्ये स्वामी शामानंद महाराज पुण्य अशा गोकर्ण भूमीतून मुंबई मधील घाटकोपर उपनगरातील भटवाडी येथे आले. अध्यात्मातून ज्ञानाचा दीप लोकांमध्ये प्रज्वलित करणे या जाणीवेतून स्वामींनी १९५४ मध्ये माता महाकाली मंदिरात बालवाडी सुरु केली आणि शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या भटवाडी विभागातील मुलांमध्ये अभ्यासाची आवड निर्माण झाली. आपल्या परिसरातील मुलांनी ज्ञानाने मोठे व्हावे, समृद्ध व्हावे त्यासाठी शाळा सुरु करावी ही एकच गोष्ट स्वामींच्या मनाला सतावू लागली आणि मग गुरूने आपली मनोकामना निष्ठावंत भक्त स्व.पी.के.शिंदे व श्री. राऊतसरांकडे व्यक्त केली. सरांनी स्वामींच्या इच्छेला स्वीकृती दिली. स्वामींची ही संकल्पना त्यावेळचे आमदार स्व.श्री.दत्ता सामंत, स्व.श्री.शिंदे, श्री. राऊतसर व सॉलीसीटर श्री.शरद चिटणीस यांच्या प्रेरणेतून पूर्णत्वास आली आणि सन १९८७ साली स्वामी शामानंद हायस्कूलची स्थापना झाली. अश्या रीतीने शिशु वर्ग ते बारावी पर्यंतच्या शिक्षणाचे दरवाजे भटवाडी बर्वेनगर परिसरातील शेकडो अल्प उत्पन्न गटातील पालकांसाठी खुले झाले.

संस्थेचे आधारस्तंभ राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त मान. राऊतसर व कै. मान.राऊत मॅडम यांच्या नेतृत्वाखाली मागील ३० वर्षे संस्थेचे कार्य अव्याहत सुरु आहे. संपूर्ण शाळा भाड्याच्या खोल्यांमध्ये भरत असतानाही यशाचे किल्ले सर करीत आहे. स्वामींच्या आशीर्वादाचे बळ तर आहेच परंतु परिसरातील सर्व पालक तसेच प्रतिष्ठित व्यक्ती आणि समाजसेवक यांचे सहकार्य यापुढेही सदैव अपेक्षित आहे. ही जबाबदारी उचलण्यासाठी आमचे हात पुढे आहेत, आपले ही हात पुढे होऊ द्यात आणि विद्यादानाचा हा यज्ञ अव्याहतपणे धगधगता राहू द्या.

# विद्या विकास एज्युकेशन सोसायटी

# स्वामी शामानंद एज्युकेशन सोसायटी

## प्रेरणास्थान



आदरणीय **राष्ट्रपती डॉ.शंकर दयाळ शर्मा** यांच्या हस्ते
१९९४ चा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार स्विकारताना
**सन्मा. श्री.प.म.राऊत सर (संचालक)**



आदरणीय **राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.कलाम** यांच्या हस्ते
२००१ चा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार स्विकारताना
माजी प्राचार्या विकास हायस्कूल ज्युनि. कॉलेज,
संस्थेच्या विश्वस्त सी.ई.ओ.,
**कै. श्रीम. विद्या प. राऊत मॅडम**



**श्री. शिवाजी ज्ञानपीठ (इंटरनॅशनल), मुंबई या संस्थेतर्फे**
**पेशवा मोरोपंत पिंगळे जीवनगौरव पुरस्कार, २०१८**
**स्विकारताना संस्थापक अध्यक्ष गुरुवर्य श्री. प. म. राऊत सर**




**संस्थेचे अध्यक्ष आदरणीय श्री. . श्री.प.म.राऊत सर यांच्या सहस्त्रचंद्र दर्शन सोहळ्या निमित्त संस्थेच्या उभारणीच्या काळामध्ये महत्त्वाचे योगदान दिलेल्यापैकी काही माजी शिक्षकांना**
**"गुरुवर्य पुरस्कार २०१८" प्रदान करण्यात आला.**

# विद्या विकास एज्युकेशन सोसायटी
# स्वामी शामानंद एज्युकेशन सोसायटी
## मार्गदर्शक तत्वे

१. विकसनशील शैक्षणिक संस्था हे सशक्त समाजाचे प्रतीक आहे. पर्यायाने प्रगतीशील राष्ट्राच्या वाटचालीकडे दिशादर्शकाचे काम शैक्षणिक संस्था करत असतात. विद्या विकास एज्युकेशन सोसायटी या संस्थेचे एकमेव उद्दिष्ट सर्व वयोगटाच्या विद्यार्थ्यांना जीवन शिक्षण प्राप्त करुन देणे हे आहे.

२. विद्यार्थी हा समाजाचा महत्त्वपूर्ण घटक आहे. त्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने त्यांच्या संवेदनशील मनात आपले कुटुंब, शाळा व राष्ट्र यांविषयी विधायक व सौंदर्यपूर्ण दृष्टीकोन व आस्था निर्माण करणे यासाठी शाळेच्या प्रयत्नांना पालकांच्या सहकार्याची आवश्यकता आहे.

३. स्वच्छता, नियमितपणा, प्रामाणिकपणा, टापटीपपणा, शिस्तप्रियता, कृतज्ञता व सद्वर्तन इ. गुणांचा अंतर्भाव विद्यार्थ्यांच्या मानसिकतेत व वर्तनात बदल करण्याची जबाबदारी शाळेसोबत पालकांनीही अंगिकारावी.

४. अन्न, वस्त्र, निवारा याप्रमाणेच शिक्षण मानवाचा मूलभूत अधिकार आहे. प्रत्येकाने एक जबाबदार समाजघटक म्हणून हा अधिकार प्राप्त करुन घेतला पाहिजे व इतर सामाजिक कर्तव्य पूर्ततेकडे लक्ष दिले पाहिजे.


भारत
राजकीय नकाशा
ताजिकिस्तान
अफगाणिस्तान
पा कि स्ता न
ची न
(तिबेट)
लडाख
लेह
श्रीनगर
जम्मू व काश्मीर
जम्मू
हिमाचल प्रदेश
शिमला
पंजाब
चंडीगड
देहरादून
उत्तराखंड
हरियाणा
दिल्ली
नवी दिल्ली
नै पा ळ
सिक्किम
गंगटोक
भू ता न
अरूणाचल प्रदेश
इटानगर
उत्तर प्रदेश
लखनौ
जयपूर
राजस्थान
बिहार
पटना
दिस्पुर
आसाम
नागालँड
कोहिमा
मेघालय
शिलाँग
मणिपूर
इम्फाल
बांगलादेश
अगरतला
त्रिपुरा
आयझॉल
मिझोरम
झारखंड
रांची
पश्चिम बंगाल
कोलकाता
गांधीनगर
गुजरात
भोपाळ
मध्य प्रदेश
छत्तीसगड
रायपूर
भुवनेश्वर
ओडिशा
म्यानमार
(बर्मा)
दमण
दादरा आणि नगर हवेली आणि दमण आणि दीव
मुंबई
महाराष्ट्र
बंगालचा खाडी
तेलंगणा
हैदराबाद
यानम (पुडुचेरी)
अमरावती
अरबी समुद्र
पणजी
गोवा
कर्नाटक
आंध्र प्रदेश
अंदमान आणि निकोबार बेटे (भारत)
चेन्नई
बेंगलुरु
लक्षद्वीप (भारत)
माहे (पुडुचेरी)
पुडुचेरी
पोर्ट ब्लेअर
कावरत्ती
तामिळनाडू
कराईकल (पुडुचेरी)
केरळा
पाल्क सामुद्रधुनी
आंतरराष्ट्रीय सीमा
राज्य/केंद्रशासित प्रदेश सीमा
देशाची राजधानी
राज्य/केंद्रशासित प्रदेश राजधानी
तिरूवनंतपुरम
श्रीलंका
Map not to Scale
हिं दी म हा सा ग र
Copyright © 2020 www.mapsofindia.com

भारताची राजमुद्रा

# भारतीय संविधान

## प्रास्ताविका

आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम
समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा
व उपासना यांचे स्वातंत्र्य;
दर्जाची व संधीची समानता;

निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा

व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी बंधुता
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करुन;

आमच्या संविधानसभेत
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करुन
स्वतःप्रत अर्पण करत आहोत.

## ॥ वन्दे मातरम् ॥

**सुजलां सुफलां मलयज शीतलाम्**

**सस्य शामलां मातरम् वंदे मातरम् ॥**

**शुभ्रज्योत्सनां-पुलकित-यामिनीम् ।**

**फुल्लकुसुमित्-द्रुमदल-शोभिनीम ।**

**सुहासिनीं,सुमधुर-भाषिणीम् ।**

**सुखदां,वरदां,मातरम् वंदे मातरम् ॥**

**- बंकीमचंद्र चटोपाध्याय**

## राष्ट्रीय गीताचा भावानुवाद

हे भारतमाते! आम्ही तुला वंदन करतो.

तू उत्तम जलांनी संपन्न असलेली व धनधान्यांनी समृध्द आहेस.

मलय पर्वतावरुन येणाऱ्या सुगंधित वायुलहरींनी तू शीतल झाली आहेस.

विपूल शेतीमुळे हे माते! तू सावळी दिसत आहेस.

पांढऱ्याशुभ्र चंदेरी चांदण्यांमुळे तुझ्या रात्री प्रफुल्लित असतात.

फुलांच्या बहरांमुळे हे मातृभूमी! तू वृक्षलतांचे वस्त्र परिधान केल्यासारखी शोभायमान दिसतेस.

सदा हसतमुख आणि मधूर बोलणारी तू आम्हाला सदैव सुखदायिनी व वरदायिनी आहेस.

हे मातृभूमी! आम्ही तुला वंदन करतो.

## ॥ जनगनमन अधिनायक ॥

जन-गण-मन अधिनायक जय हे,भारत-भाग्य-विधाता।

पंजाब,सिंध,गुजराथ,मराठा,द्राविड,उत्कल,बंग,

विन्ध्य,हिमाचल,यमुना-गंगा,उच्छल जलधि तरंग;

तव शुभ नामे जागे ;

तव शुभ आशिष माँगे ;

गाहे तव जय गाथा।

जन-गण-मंगलदायक जय हे,भारत-भाग्य-विधाता॥

जय हे, जय हे, जय हे,

जय जय जय, जय हे॥ - गुरुवर्य रविंद्रनाथ टागोर

## राष्ट्रगीताचा मराठी भावानुवाद

तू जनता ह्रदयाचा स्वामी आहेस.

तू भारताचा भाग्योदय करणारा परमेश्वर आहेस.

तुझ्या शुभ नामघोषाने पंजाब, सिंध, गुजराथ, महाराष्ट्र, द्राविड, ओरिसा, बंगाल हे प्रांत आणि विंध्याद्री, हिमाचल व गंगा - यमुनेचे जलतरंग, तसेच उसळी मारणाऱ्या समुद्राच्या लाटाही जागृत होतात. तुझे शुभाशिर्वाद मागतात. तुझ्या यशोगानाची गाथा गातात, तुझ्या नामाचा जयघोष करतात. सर्व जनतेचे मंगल करणारा भारताचा स्वामी आहेस.

तुझा जयजयकार असो !




## महाराष्ट्र राज्य
## राजकीय नकाशा

# आपले महाराष्ट्र राज्य

- स्थापना-१ मे १९६०
- राज्यभाषा – मराठी
- एकूण तालुके – ३५३
- पंचायत समित्या – ३५१
- एकूण जिल्हा परिषद – ३३
- आमदार विधानसभा – २८८
- आमदार विधानपरिषद – ७८
- महाराष्ट्र लोकसभा सदस्य – ४८
- समुद्र किनारा – ७२० कि.मी.
- नगरपालिका – २३०
- महानगरपालिका – २६
- शहरी भाग – ४५%
- ग्रामीण भाग – ५५%
- लोकसंख्या बाबतीत – २ रा क्रमांक
- क्षेत्रफळात – ३ रा क्रमांक
- संपूर्ण साक्षर १ला जिल्हा – सिंधुदूर्ग
- सर्वात कमी साक्षर जिल्हा – नंदूरबार
- महाराष्ट्रातील सर्वाधिक लोकसंख्या - मुंबई उपनगर
- महाराष्ट्रातील सर्वात कमी लोकसंख्या – नंदूरबार
- महाराष्ट्रातील सर्वाधिक जंगले असलेला जिल्हा – गडचिरोली
- महाराष्ट्रातील कमी जंगल असलेला जिल्हा – बीड
- महाराष्ट्रातील सर्वाधिक आदिवासी असलेला जिल्हा - नंदूरबार
- महाराष्ट्रातील अधिक तलावांचा जिल्हा – गोंदिया
- महाराष्ट्रातील क्षेत्रफळाने सर्वात मोठा जिल्हा – अहमदनगर
- महाराष्ट्रातील क्षेत्रफळाने सर्वात लहान जिल्हा - मुंबई शहर
- महाराष्ट्रातील उंच शिखर – कळसूबाई (१६४६ मी )
- महाराष्ट्रातील सर्वात लांब नदी – गोदावरी
- महाराष्ट्रातील सर्वान लहान राष्ट्रीय महामार्ग – न्हावाशेवा पळस्पे २७ किमी
- महाराष्ट्रातील सर्वात जुनी नगरपालिका - रहिमतपूर (सांगली)
- गोदावरी नदीवरील पहिले मातीचे धरण – गंगापूर
- महाराष्ट्रात सर्वात जास्त समुद किनारा लाभलेले शहर – मुंबई
- जगातील पहिले जैव तंत्रज्ञान विदयापीठ - नागपूर
- भारतातील सर्वात मोठे नैसर्गिक बंदर – मुंबई

# सरस्वती स्तवन

या कुन्देन्दु-तुषारहार-धवला या शुभ्र-वस्त्रांवृता |

या वीणा वर दण्ड-मण्डितकरा या श्वेत-पद्मासना ||

या ब्रह्मच्युत शंकर प्रभृतिभि : देवै : सदा वन्दिता |

सा मां पातु सरस्वती भगवती नि:शेष जाडया: पहा ||

## सरस्वती स्तवन भावानुवाद

कुंद,चंद्र व हिमतुषार यांच्या सारखा,

जिचा वर्ण आहे, जी शुभ्र वस्त्रांनी आवृत्त आहे,

जिचे हस्त सुंदर वीणेने अलंकृत आहे,

जी श्वेत कमलावर बसली आहे,

जिची ब्रह्म-विष्णू-महेशादी सर्वकाल वंदना

करीत आहेत आणि जी सर्व प्रकारच्या

जडतेचा नाश करणारी आहे.

अशी सरस्वती देवी माझे रक्षण करो.

# || श्री ज्ञानेश्वरी ||

## || पसायदान ||

आतां विश्वात्मका देवें || येणें वाग्यंज्ञे तोषावें || तोषोनि मज द्यावें || पसायदान हें || १ ||

जे खळांची व्यंकटी सांडो || तयां सत्कर्मी रति वाढो || भूता परस्परें पडो || मैत्र जीवाचें || २ ||

दुरितांचे तिमिर जावो || विश्व स्वधर्मसूर्ये पाहो || जो जें वांछील तो तें लाहो || प्राणिजात ||३ ||

वर्षत सकळ मंगळी || ईश्वरनिष्ठांची मांदियाळी || अनवरत भूमंडळी || भेटतु भूतां ||४ ||

चलां कल्पतरुंचे आरव || चेतना चिंतामणीचे गांव || बोलते ते अर्णव || पीयुषाचे ||५ ||

चंद्रमे जे अलांच्छन || मार्तंड ते तापहीन || ते सर्वाही सदा सज्जन || सोयरे होतु ||६ ||

किंबहुना सर्वसुखी || पूर्ण होवोनि तिहीं लोकी || भजिजो आदिपुरुखीं || अखंडित ||७ ||

आणि ग्रन्थोपजीविये || विशेषीं लोकीं इये || दृष्टादृष्टविजयें || होआवें जी ||८ ||

येथ म्हणे श्री विश्वेश्वरावो || हा होईल दानपसावो || येणे वरें ज्ञानदेवो || सुखिया जाला ||९ ||

## पसायदान भावानुवाद

आतां विश्वरुपीं देवानें या वाग्यंज्ञानें संतुष्ट होऊन मला असें पसायदान द्यावें खळांचा कुटिलपणा नाहींसा व्हावा,आणि त्यांची सत्कर्माच्या ठिकाणीं आवड वाढवावी व प्राण्यांची एकमेकांशी जीवाभावापासून मैत्री व्हावी. पापांचा अंधार जावा व विश्वात स्वधर्मरुपी सूर्याचा उदय व्हावा. प्राणिमात्रांत जो जें इच्छिल,तें त्याला प्राप्त होवो. संपूर्ण कल्याणाचा वर्षाव करणाऱ्या ईश्वरनिष्ठांचे समुदाय या भूतलावर निरंतर सर्व प्राण्यांना भेटोत. चालणाऱ्या कल्पतरुंचे बगीचे, सजीव चिंतामणीचे गांव व अमृताचे जे बोलणारे सागर आहेत, जे कलंकरहित चंद्र आहेत व जें उष्णतारहित सूर्य आहेत ते सज्जन सर्वांना नेहमी आवडते व्हावेत. सोयरे व्हावेत. त्रैलोक्य सर्व सुखाने पूर्ण होऊन, त्यानें आदिपुरुषांच्या ठिकाणीं अखंडित भजावें आणि महाराज, या मृत्यूलोकांत विशेषकरुन हा ग्रंथच ज्यांचे जीवन होऊन राहिला असेल, त्यांनी इहलोकींच्या व परलोकींच्या भोगांवर विजयी व्हावें, तेव्हां विश्वाचे प्रभुराय श्री निवृत्तिनाथ म्हणाले कीं, हा दानप्रसाद होईल. या वरानें ज्ञानदेव अंत:करणांत सुखी झाले.

# ई-वर्ग नियम

१. सत्राच्या 10 मिनिटांपूर्वी प्रत्येक मुलाने वर्गात प्रवेश केला पाहिजे.

२. चॅट बॉक्सचा असंबद्ध वापर टाळला पाहिजे.

३.प्रत्येक मुलास मायक्रोफोन नि:शब्द करणे आवश्यक आहे आणि कॅमेरा बंद करणे आवश्यक आहे. जोपर्यंत त्याला / तिला सशब्द करणे, उत्तर देणे किंवा व्हिडिओवर स्वत: ला सादर करण्यास सांगितले जात नाही.

४. शिक्षक पीपीटी / व्हिडिओ शिकवत असताना / सादर करत असताना विद्यार्थ्यांनी स्क्रीनचे सादरीकरण टाळले पाहिजे.

५. विद्यार्थ्यांनी ई-वर्गांसाठी नियमित असणे आवश्यक आहे.

६. एकदा वर्गात प्रवेश घेतल्यानंतर शिक्षकांनी वर्ग पूर्ण होईपर्यंत विद्यार्थी उपस्थित असणे आवश्यक आहे.

७. शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ च्या निकालापर्यंत सर्व संप्रेषण, नोट्स, धडे जतन करणे आवश्यक आहे.

**घरी रहा सुरक्षित रहा**

# नियम

- विद्यार्थ्यांनी शाळेच्या वेळेआधी १० मिनिटे हजर असावे. मधल्या सुट्टीत विद्यार्थ्यांना शाळेबाहेर जाता येणार नाही.
- उशीरा आलेल्या विद्यार्थ्यांस पालकांच्या सहीचे लेखीपत्र आणणे आवश्यक आहे. अन्यथा शाळेकडून या शिस्तभंगाची नोंद घेतली जाईल.
- बेशिस्त व गैरवर्तन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे नाव शाळेतून काढले जाईल.
- शालेय सामानाची नासधूस करणाऱ्या विद्यार्थ्यांस त्याचा खर्च भरुन दयावा लागेल.
- स्वत:ची वहयापुस्तके व वस्तू यासाठी विद्यार्थी स्वत:च सर्वतोपरी जबाबदार असेल.
- नागरी प्रशिक्षणाचा भाग म्हणून सहशालेय उपक्रमात सर्व विद्यार्थ्यांना सहभागी होणे आवश्यक आहे.गैरहजेरीकरिता कोणाचीही सबब ग्राहय धरली जाणार नाही.
- मुख्याध्यापकांच्या परवानगीशिवाय विद्यार्थ्यांनी कुठल्याही स्वरुपाची वर्गणी रक्कम (मदत, सहाय्यनिधी इ.) गोळा करु नये.
- पालकांनी आपल्या पाल्याची दैनंदिनी व प्रगतिपुस्तक यांतील नोंदी अथवा शेरा इत्यादी रोज तपासावे.
- विद्यार्थ्यांच्या हजेरीमध्ये शिस्त व नियमितपणा अंगिकारण्यासाठी पालकांनी शिक्षकांना साहाय्य करावे.
- शाळेतील संपर्कासाठी पालकांनी आपल्या पाल्याच्या नाव, वर्ग, तुकडी, विभाग इ.माहितीसह कार्यालयीन वेळेत मुख्याध्यापकांना भेटावे.
- शालेय कामकाजाच्या वेळेत पालकांनी शिक्षकांना भेटू नये. आवश्यक मार्गदर्शनासाठी पालकांनी शनिवार अथवा महिनाअखेरच्या दिवशी शिक्षकांना भेटावे.
- पालकांचे पत्ते शाळेच्या दप्तरी नोंदवलेले असतात. त्यातील बदल पालकांनी शाळेस कळवावेत.

# पालकांकरिता मार्गदर्शन

## आपल्या पाल्याच्या प्रगतीसाठी शाळेला सहकार्य करा :

- दात,डोळे,नाक यांची नियमित स्वच्छता करणे,रोजच्या रोज आंघोळ करणे,नियमित नखे काढणे,स्वच्छ कपडे (गणवेश) घालणे,या चांगल्या सवयी पाल्याला लागणे गरजेचे आहे.त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करा.
- पाल्याला स्वत:ची कामे स्वत: करण्याची लहानपणापासून सवय लावा.
- पाल्याला शाळेत नियमितपणे आणि वेळेवर पाठवा.
- पाल्याला रोज एक तास त्याच्या वयाच्या अनुरुप खेळ खेळण्याची संधी दया.
- शाळेतील कार्यक्रम/अभ्यास या विषयी दररोज माहिती घ्या.
- पाल्याला रोज अभ्यासाला बसवा.
- रेडिओ,टी.व्ही.वापरांवर नियंत्रण ठेवा परंतु शैक्षणिक ज्ञान वाढविणारे कार्यक्रम ऐकण्यास पाहण्यास उत्तेजन द्यावे.
- जेवतांना सर्व पदार्थ खाण्याची सवय लावा.
- एखादा चांगला छंद जोपासण्यासाठी पाल्याला मदत करा.
- घरात व घराबाहेर इतरांना मदत करण्याची सवय लावा.अधून मधून शाळेत या,शिक्षकांची भेट घ्या.आपल्या पाल्याच्या प्रगती विषयी त्यांच्याशी बोला.भेटण्याची वेळ सकाळ अधिवेशन १० ते १०.२०दुपार अधिवेशन १२ते १२.२०
- पत्ता बदलल्यास शाळेला कळविणे.
- पाल्य गैरहजर राहिल्यास दैनंदिनीमध्ये कारण लिहून दयावे.

## शाळेचे नियम:

- विद्यार्थ्यांने रोज येताना ठरवून दिलेला गणवेश घालूनच शाळेत आले पाहिजे.
- रोज शाळेत १० मिनिटे अगोदर उपस्थित रहावे.
- विद्यार्थ्याचे नाव काढावयाचे असल्यास लेखी अर्ज करावा व त्यात शाळा सोडण्याचे कारण नमूद करावे.

## विद्यार्थ्यांकरीता :

- शिक्षक शिकविताना लक्षपूर्वक ऐका व पहा.
- आपला अभ्यास मन लावून स्वत:च करा.
- शाळेत येताना शैक्षणिक साहित्य आणायला विसरु नका.
- तुमची कोणतीही अडचण वर्गशिक्षकांना सांगा.
- प्रगती पुस्तक मिळाल्यापासून पालकांची सही घेऊन तीन दिवसांच्या आत आणून द्या.
- स्वत:ची कामे स्वत: करा.

# शालेय सुट्ट्यांची यादी २०२०-२०२१

| अ. क्र | महिना | वार | तारीख | दिनविशेष | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | ऑगस्ट | शनिवार | ०१-०८-२० | बकरी ईद | 1 |
| 2 | ऑगस्ट | बुधवार | १२-०८-२० | गोपाळकाला | 1 |
| 3 | ऑगस्ट | शनिवार ते गुरुवार | २२/०८/२०२० ते २७/०८/२०२० | गणेशोत्सव | 5 |
| 4 | सप्टेंबर | मंगळवार | ०१-०९-२० | अनंत चतुर्दशी | 1 |
| 5 | ऑक्टोबर | शुक्रवार | ०२-१०-२० | महात्मा गांधी जयंती | 1 |
| 6 | ऑक्टोबर | शुक्रवार | ३०-१०-२० | ईद-ए-मिलाद | 1 |
| 7 | नोव्हेंबर | बुधवार ते शनिवार | ११/११/२०२०ते २८/११/२०२० | दिवाळी | 16 |
| 8 | नोव्हेंबर | सोमवार | ३०-११-२० | गुरुनानक जयंती | 1 |
| 9 | डिसेंबर | गुरुवार ते शनिवार | २४/१२/२०२० ते २६/१२/२०२० | ख्रिसमस | 3 |
| 10 | जानेवारी | गुरुवार | १४-०१-२१ | मकरसंक्रांती | 1 |
| 11 | फेब्रुवारी | शुक्रवार | १९-०२-२१ | शिवजयंती | 1 |
| 12 | फेब्रुवारी | गुरुवार | ११-०३-२१ | महाशिवरात्र | 1 |
| 13 | मार्च | सोमवार | २९-०३-२१ | धुलीवंदन | 1 |
| 14 | एप्रिल | शुक्रवार | ०२-०४-२१ | गुड फ्रायडे | 1 |
| 15 | एप्रिल | मंगळवार | १३-०४-२१ | गुढीपाडवा | 1 |
| 16 | एप्रिल | बुधवार | १४-०४-२१ | डॉ.आंबेडकर जयंती | 1 |
| 17 | एप्रिल | बुधवार | २१-०४-२१ | रामनवमी | 1 |
| 16 | मे | सोमवार | ३/०५/२०२१ ते १३/०५/२०२१ | उन्हाळी सुट्टी | 37 |
| | | | | राखीव | 1 |
| | | | | एकूण सुट्ट्या | 76 |

**उत्सव**

| अ. क्र. | महिना | वार | दिनांक | दिनविशेष | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | ऑगस्ट | शनिवार | १५-०८-२० | स्वातंत्र्य दिन | 1 |
| 2 | जानेवारी | मंगळवार | २६-०१-२१ | गणतंत्र दिवस | 1 |
| 3 | मे | शनिवार | ०१-०५-२१ | महाराष्ट्र दिन | 1 |
| | | | | एकूण उत्सव | 3 |

# स्वामी शामानंद एज्युकेशन सोसायटीचे

# स्वामी शामानंद शिशु विभाग

बर्वेनगर नगर, भटवाडी (पश्चिम), मुंबई-४०० ०८४

## इयत्ता - छोटा शिशु

E-mail :- swamishamanandmarathiprimary@gmail.com

Website:- http://www.swamishamanand.com

Tel. No. :- (022) 25090577

## बालवाडीची उद्धिष्टये व ध्येय

- बालकाच्या शारीरिक, सामाजिक व बौद्धिक विकासासाठी प्रयत्नशील राहणे.
- बालकांमध्ये सुदृढ शरीराबरोबर स्नायुंच्या पुरेशा हालचाली व मूलभूत शारीरिक हालचालींची वाढ करणे.
- बालकाच्या आरोग्यविषयक चांगल्या सवयी, मलमूत्रविसर्जन सवयी, आहारविषयक सवयी इत्यादी विषयी कार्यरत राहणे. उदा. कपडे व्यवस्थित घालणे शि-सू ला जाणे, व्यवस्थित खाणे इ.
- बालकाचा वैयक्तिक भावभावनांची अभिव्यक्ती व त्यावरील नियंत्रण इ. विषयी मार्गदर्शन करणे व भावनिक सामंजस्याची वाढ घडवून आणणे.
- सामाजिक वर्तन व नियम याविषयी मार्गदर्शन करणे.
- मुलांमध्ये जीवनविषयक सौंदर्यपूर्ण निकोप जीवनदृष्टी निर्माण करणे.
- स्वातंत्र्य (आत्मनिर्भरता) व कलात्मकता या गोष्टी मुलांमध्ये रुजविताना त्यांना अभिव्यक्तीच्या पुरेशा संधी उपलब्ध करून देणे.
- अचूक उच्चारासह आपले विचार, भावना मांडण्याची कुबत पालकांमध्ये निर्माण करणे.

## पालकांसाठी सूचना

- शाळा सुरू असताना मुख्याध्यापकांच्या परवानगीशिवाय वर्गात जाऊन शिक्षकांना भेटण्यास सक्त मनाई आहे.
- पालकांनी प्रत्येक महिन्याच्या १५ तारखेपर्यंत मासिक फी भरणे बंधनकारक राहील.
- शिक्षकांसाठी किंवा अन्य कोणत्याही शालेय कर्मचाऱ्यांसाठी पालकांनी भेट वस्तू आणू नये. तसे आढळल्यास कारवाई केली जाईल.
- पालकांनी विद्यार्थ्यांचा वाढदिवस घरच्या घरी साजरा करावा शाळेत कोणत्याही स्वरूपाचा खाऊ व भेटवस्तू पाठवू नयेत. शाळेमध्ये वर्गशिक्षक व वर्गमित्र शुभेच्छा देतील. केवळ रंगीत कपड्यात पाठवावे.
- विद्यार्थ्यांकडून रोजच्या रोज गृहपाठ घरीच पूर्ण करून घेण्यासाठी पालकांनी सहकार्य करावे. पालकांनी लिहून देऊ नये.
- परीक्षेचे दिवस वगळता दर बुधवारी विद्यार्थ्यांनी रंगीत कपडे घालावेत.
- पालक वर्गशिक्षकांना फक्त शनिवारी १०.०० ते ११.०० या वेळी भेटू शकतात.
- एप्रिल व मे महिन्यांची फी पालकांनी एप्रिल महिन्यातच भरावी.
- दैनंदिनी मधील नियोजनामधील बदल हे शालेय व्यवस्थापनाच्या दृष्टीकोनातून केलेले, तात्कालिक स्वरूपाचे असू शकतात क्रुपया पालकांनी याची दखल घ्यावी.

## पालकांसाठी मार्गदर्शन

विद्यार्थ्यांच्या शालेय शिस्तीविषयी व नियमित ते विषयी पालकांनी सजग असावे.

१. आपले कुटुंब. शाळा, राष्ट्र याविषयी विद्यार्थ्यांच्या मनात सौंदर्यपूर्ण दृष्टीकोन व आस्था निर्माण करण्यास पालकांनीही शाळेच्या प्रयत्नांना जोड द्यावी.

२. पाल्याच्या वाढीमध्ये पालकांनी दिलेला मैत्रीपूर्ण पाठिंबा मुलांमधील आत्मविश्वास वाढवतो.

३. स्वच्छता, नियमितपणा, प्रामाणिकपणा, टापटीपपणा, शिस्तप्रियता, कृतज्ञता व सद्वर्तन इ. गुणांच्या पाल्यांच्या मानसिकतेत, वर्तनात अंतर्भाव करण्याची जबाबदारी पालकाने स्वीकारावी.

४. शाळेतील पालकसभांना संबंधित पालकांनी आवर्जून हजर राहावे.

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे.सारे भारतीय माझे बांधव आहेत .

माझ्या देशावर माझे प्रेम आहे.

माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे.

त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करेन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधा या माणसांचा मान ठेवेन-

आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे.

त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

## रोज म्हणावयाच्या प्रार्थना

प्रारंभी विनंती करू गणपती
विद्या दया सागरा
अज्ञानत्व हरोनी बुद्धी मति दे
आराध्य मोरेश्वरा
चिंताक्लेश दारिद्र्य दुःख अवघे
देशांतर पाठवी
हेरंबा गणनायका गजमुखा
भक्ता बहु तोषवी
नेत्री दोन हिरे प्रकाश पसरे
अत्यंत ते साजिरे
माथा शेंदूर पाझरे वरी भरे
दुर्वांकुरांचे तुरे
माझे चित्त विरे मनोरथ पुरे
देखोनि चिंता हरे
गोसाविसुत  वासुदेव कवी रे
त्या मोरयाला स्मरे

## जेवाणापूर्वीची पार्थना

वदनी कवळ घेता

नाम घ्या श्रीहरीचे |

सहज हवन होते

नाम घेता फुकाचे |
जीवन करि जीवित्व

अन्न हे पूर्ण ब्रम्ह |

उदारभरण नोहे

जाणिजे यज्ञ कर्म ||

# पाठांतरासाठी गीताई

## अध्याय बारावा

### अर्जुन म्हणाला

असे मिसळले कोणी तुज भक्त उपासिती ।
कोणी अक्षर अव्यक्त योगी ते थोर कोणते ॥ १ ॥

श्री भगवान् म्हणाले

रोवूनि मन माझ्यात भजती नित्य जोडिले ।
श्रद्धेने भारले माझ्या ते योगी थोर मानितो ॥ २ ॥

परी अचिंत्य अव्यक्त सर्वव्यापी खुणेविण ।-
नित्य निश्चळ निर्लिप्त जे अक्षर उपासती ॥ ३ ॥

रोधिती इंद्रिये पूर्ण सर्वत्र सम जाणुनी ।
माझ्या कडे चि ते येती ज्ञानी विश्व॥ ४हिती रत ॥ -

अव्यक्ती गोविती चित्त क्लेश त्यांस विशेष चि ।
देहवंतास अव्यक्ती सुखे बोध घडे चि ना ॥ ५ ॥

## सरस्वती वंदना (सोमवार)

या कुन्देन्दुतुषारहारधवला या शुभ्रवस्त्रावृता
या वीणावरदण्डमण्डितकरा या श्वेतपद्मासना।
या ब्रह्माच्युत शंकरप्रभृतिभिर्देवैः सदा वन्दिता
सा मां पातु सरस्वती भगवती निःशेषजाड्यापहा॥१॥

## गणपतीची आरती (मंगळवार)

सुखकर्ता दुखहर्ता वार्ता विघ्नाची

नुरवी पूर्वी प्रेम कृपा जयाची

सर्वांगी सुंदर उटी शेंदुराची

कंठी झळके माळ मुक्ताफळाची

जय देव जय देव जय मंगलमूर्ती

दर्शनमात्रे मनकामना पुरती

रत्नखचित फरा तूज गौरीकुमरा

चंदनाची उटी कुंकुमकेशरा

हिरे जडित मुकुट शोभतो बरा

रुणझुणती नुपुरे चरणी घागरिया

लंबोदर पितांबर फनी वरवंदना

सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना

दास रामाचा वाट पाहे सदना

संकटी पावावे निर्वाणी रक्षावे सुरवंदना

जय देव जय देव जय मंगलमूर्ती

दर्शनमात्रे मनकामना पुरती

## श्री हनुमान चालिसा (बुधवार)

जय हनुमान ज्ञान गुन सागर।
जय कपीस तिहुँ लोक उजागर॥
रामदूत अतुलित बल धामा।
अंजनिपुत्र पवनसुत नामा॥-
महाबीर बिक्रम बजरंगी।
कुमति निवार सुमति के संगी॥
कंचन बरन बिराज सुबेसा।
कानन कुंडल कुंचित केसा॥
हाथ बज्र औ ध्वजा बिराजै।
काँधे मूँज जनेऊ साजै।
संकर सुवन केसरीनंदन।
तेज प्रताप महा जग बन्दन॥

## गुरुवंदना (गुरुवार )

ज्या ज्या स्थळी मन जाय माझे
त्या त्या स्थळी हे निजरूप तुझे
मी ठेवितो मस्तक ज्या-ज्या ठिकाणी
तेथे तुझे सद्गुरू पाय दोन्ही
अवधून चिंतनम श्री गुरुदेव दत्त

## ऋणनिर्देश (शुक्रवार)

देवा तुझे किती सुंदर आकाश
सुंदर प्रकाश सूर्य देतो
सुंदर चांदण्या, चंद्र हा सुंदर
चांदणे सुंदर पडे त्याचे
सुंदर ही झाडे, सुंदर पाखरे
किती गोड बरे गाणे गाती
सुंदर वेलींची सुंदर ही फुले
तशी आम्ही मुले देवा तुझी

# मनाचे श्लोक

गणाधीश जो ईश सर्वा गुणांचा |
मुळारंभ आरंभ तो निर्गुणांचा ||
नमू शारदा मूळ चत्वार वाचा |
गमू पंथ आनंत या राघवाचा ||१||

मना सज्जना भक्तिपंथेचि जावे |
तरी श्रीहरि पाविजे तो स्वभावे ||
जनी निंद्य ते सर्व सोडून द्यावे |
जनी वंद्य ते सर्व भावें करावे ||२||

प्रभाते मनी राम चिंतीत जावा |
पुढे वैखरी राम आधी वदावा ||
सदाचार हा थोर सांडू नये तो |
जनी तोची तो मानवी धन्य होतो ||३||

मना वासना दुष्ट कामा न ये रे |
मना सर्वथा पापबुद्धी नको रे ||
मना धर्मता नीती सोडू नको हो |
मना अंतरी सार विचार राहो ||४||

मना पापसंकल्प सोडूनी द्यावा |
मना सत्य संकल्प जीवी धरावा ||
मना कल्पना ते नको विषयांची |
विकारे धडे हो जनी सर्व ची ची ||५||

# छोटा शिशु अभ्यासक्रम - २०२०-२१

## जून

| अनुक्रमांक | विषय | अभ्यास |
|---|---|---|
| १ | भाषा | |
| २ | गणित | तोंडी- १ ते ५ अंक |
| ३ | गाणी | पाऊस, मासा |
| ४ | गोष्ट | ससा व कासव |
| ५ | संगीत | आभाळ वाजलं धडामधुम |
| ६ | संकल्पना | माझे नाव |
| ७ | सामान्य ज्ञान | माझे शरीर |

## जुलै

| अनुक्रमांक | विषय | अभ्यास |
|---|---|---|
| १ | भाषा | वाचन व लेखन - ग, म, भ |
| २ | गणित | वाचन व लेखन - १, २, ३, ४, ५ अंक, मोजणी - १ ते १० |
| ३ | सामान्य ज्ञान | वेगवेगळी फळे |
| ४ | गाणी | १) मैफल २) अटक मटक ३) आम्ही शिकलो एक |
| ५ | गोष्ट | ससा व कासव |
| ६ | चित्रकला | चेंडू (पाटीवर) रंगकाम - वर्गपाठ, गृहपाठ |
| ७ | हस्तकला | चौकोन घडी |
| ८ | मातीकाम | चेंडू |
| ९ | इंद्रिय विकास | आवाज (लहान) उदा.डब्यातील वाळूचा आवाज |
| १० | खेळ | माझी वाद्ये |
| ११ | संकल्पना | माझे नाव, कमी व जास्त |
| १२ | सण | आषाढी एकादशी,निसर्गपूजा |
| १३ | इंग्रजी | Simple Strokes |

| | | |
|---|---|---|
| १४ | संभाषण | माझे कुटुंब |
| १५ | संगीत | मछली जल की रानी , निळया रंगाचे गाणे |
| १६ | जीवन व्यवहार | शर्टला बटण लावणे |

## ऑगस्ट

| अनुक्रमांक | विषय | अभ्यास |
|---|---|---|
| १ | भाषा | वाचन व लेखन - न, प, ष |
| २ | गणित | वाचन व लेखन - ६ ते १० अंक, मोजणी - १ ते १५ |
| ३ | सामान्य ज्ञान | विविध फुले |
| ४ | गाणी | १) रंग २) तिरंगा- ध्वज ३) आमच्या या घरात |
| ५ | गोष्ट | कोल्हाला द्राक्षे आंबट |
| ६ | चित्रकला | चॉकलेट |
| ७ | हस्तकला | त्रिकोणी घडी |
| ८ | मातीकाम | नागोबा |
| ९ | इंद्रिय विकास | आवाज (मोठा) उदा.डब्यातील वाळूचा आवाज |
| १० | संकल्पना | माझ्या शाळेचे नाव |
| ११ | संभाषण | माझ्या बाई, माझा वर्ग |
| १२ | संगीत | राखीचे गाणे, नागोबा |
| १३ | सण | रक्षाबंधन, गोपाळकाला, स्वातंत्र्यदिन, गणेशोत्सव |
| १४ | इंग्रजी | तोंडी - A, B, C, D, E, F, G |
| १५ | जीवन व्यवहार | शिवणपाटया |

## सप्टेंबर

| अनुक्रमांक | विषय | अभ्यास |
|---|---|---|
| १ | भाषा | वाचन व लेखन - फ, ण |
| २ | गणित | वाचन व लेखन - ११ ते १५ अंक, मोजणी - १ ते २० |
| ३ | सामान्य ज्ञान | विविध पक्षी |
| ४ | गाणी | 1)पिल्लूची शाळा २)परी ३)अक्कण माती चिकण माती |
| ५ | गोष्ट | बुड बुड घागरी |
| ६ | चित्रकला | सफरचंद, रंगकाम - वर्गपाठ व गृहपाठ |
| ७ | हस्तकला | साधी होडी |
| ८ | मातीकाम | मोदक |

| | | |
|---|---|---|
| ९ | इंद्रिय विकास | आवाज - घंटा / घुंगरू |
| १० | संकल्पना | माझ्या शिक्षिकेचे नाव |
| ११ | संभाषण | गणपती बाप्पा (चित्रवाचन ) |
| १२ | संगीत | हिरव्या रंगाचे गाणे |
| १३ | इंग्रजी | तोंडी - H, I, J, K, L, M, N, O, P |
| १४ | जीवन व्यवहार | बाटलीत पाणी भरणे |

## ऑक्टोबर

| अनुक्रमांक | विषय | अभ्यास |
|---|---|---|
| १ | भाषा | वाचन व लेखन - ग, म, भ, न, प, ष, फ, ण |
| २ | गणित | वाचन लेखन १ ते १५ अंक उजळणी |
| ३ | सामान्य ज्ञान | उजळणी |
| ४ | गाणी | उजळणी |
| ५ | गोष्ट | उजळणी |
| ६ | चित्रकला | उजळणी |
| ७ | हस्तकला | उजळणी |
| ८ | मातीकाम | उजळणी |
| ९ | इंद्रिय विकास | उजळणी |
| १० | संकल्पना | उजळणी |
| ११ | संभाषण | उजळणी |
| १२ | संगीत | उजळणी |
| १३ | इंग्रजी | उजळणी |
| १४ | सण | सरस्वती पूजन, दसरा |

## नोव्हेंबर

| अनुक्रमांक | विषय | अभ्यास |
|---|---|---|
| १ | भाषा | वाचन व लेखन - व, ब, क |
| २ | गणित | मोजणी- १ ते ३० अंक |
| ३ | सामान्य ज्ञान | पाळीव प्राणी |
| ४ | गाणी | दुधाची बाटली |
| ५ | चित्रकला | फुगा |

| | | |
|---|---|---|
| ६ | हस्तकला | कपाट |
| ७ | मातीकाम | लॉलीपॉप |
| ८ | इंद्रिय विकास | आंबट - लिंबू |
| ९ | संकल्पना | खाद्य मनोरा |
| १० | संभाषण | आवडता प्राणी |
| ११ | संगीत | पिवळ्या रंगाचे गाणे |
| १२ | इंग्रजी | तोंडी - Q, R, S, T, U, V, W, X, Y, Z |
| १३ | सण | बालदिन |
| १४ | जीवन व्यवहार | बटाटा सोलणे |

## डिसेंबर

| अनुक्रमांक | विषय | अभ्यास |
|---|---|---|
| १ | भाषा | वाचन व लेखन - र, स, ट, ठ |
| २ | गणित | वाचन व लेखन - २१ ते २५ अंक, मोजणी - १ ते ३५ |
| ३ | सामान्य ज्ञान | मराठी व इंग्रजी महिने |
| ४ | गाणी | मनीमाऊ, सुई, द-दत्त |
| ५ | गोष्ट | लबाड कोल्हा |
| ६ | चित्रकला | फूल काढणे |
| ७ | हस्तकला | कपाट |
| ८ | मातीकाम | बशी |
| ९ | इंद्रिय विकास | चव - तिखट मिरची |
| १० | संकल्पना | निर्जीव वस्तू / सजीव वस्तू |
| ११ | संभाषण | आपले मदतनीस |
| १२ | संगीत | गुलाबी रंगाचे गाणे |
| १३ | सण | नाताळ |
| १४ | जीवन व्यवहार | गाठ बांधणे |

## जानेवारी

| अनुक्रमांक | विषय | अभ्यास |
|---|---|---|
| १ | भाषा | वाचन व लेखन - द, त, ड |
| २ | गणित | वाचन व लेखन - २६ ते ३० अंक, मोजणी - १ ते ४० |
| ३ | सामान्य ज्ञान | घरातील खेळ, मैदानी खेळ |

| | | |
|---|---|---|
| ४ | गाणी | गोरा गोरा पान , हवा |
| ५ | गोष्ट | चल रे भोपळ्या |
| ६ | चित्रकला | छत्री - रंगकाम |
| ७ | हस्तकला | घर |
| ८ | मातीकाम | बांगडी |
| ९ | इंद्रिय विकास | चव - खारट (मीठ) |
| १० | संकल्पना | माझी जन्मतारीख, वाढदिवस |
| ११ | संभाषण | बाग (चित्रवर्णन) |
| १२ | संगीत | पतंगाचे गाणे, काळ्या रंगाचे गाणे |
| १३ | सण | मकरसंक्रांत |
| १४ | स्पर्धा | पतंग स्पर्धा |
| १५ | इंग्रजी | तोंडी H to p (No.1 to 5 ) |
| १६ | जीवन व्यवहार | झाडांना पाणी घालणे |

## फेब्रुवारी

| अनुक्रमांक | विषय | अभ्यास |
|---|---|---|
| १ | भाषा | वाचन व लेखन - च, ज, य |
| २ | गणित | वाचन व लेखन - १ ते ३० अंक, मोजणी - १ ते ४५ |
| ३ | सामान्य ज्ञान | समुद्रातील प्राणी |
| ४ | गाणी | हत्तीदादा कोठलं काय ? |
| ५ | गोष्ट | छोटीसी चिमणी, चल रे भोपळ्या |
| ६ | चित्रकला | बॅट काढणे - रंगकाम |
| ७ | हस्तकला | स्कार्फ (रुमाल) |
| ८ | मातीकाम | द्राक्ष |
| ९ | इंद्रिय विकास | चव - कडू (कारले, औषध ), तुरट (आवळा) |
| १० | संकल्पना | विविध आकार, विविध रंग |
| ११ | संभाषण | चांगल्या सवयी |
| १२ | संगीत | उजळणी |
| १३ | इंग्रजी | इंग्रजी- तोंडी- Q to Z ( No 6 to 10 ) |
| १४ | स्पर्धा | गीताई पाठांतर स्पर्धा |
| १५ | जीवन व्यवहार | घडीकाम |

## मार्च

| अनुक्रमांक | विषय | अभ्यास |
| --- | --- | --- |
| १ | भाषा | वाचन व लेखन - ग ते य |
| २ | गणित | वाचन व लेखन - १ ते ५० अंक, मोजणी - १ ते ५० |
| ३ | सामान्य ज्ञान | उजळणी |
| ४ | गाणी | उजळणी |
| ५ | गोष्ट | उजळणी |
| ६ | चित्रकला | उजळणी |
| ७ | हस्तकला | उजळणी |
| ८ | मातीकाम | उजळणी |
| ९ | इंद्रिय विकास | उजळणी |
| १० | संकल्पना | उजळणी |
| ११ | संभाषण | उजळणी |
| १२ | संगीत | उजळणी |
| १३ | इंग्रजी | उजळणी |

# वार्षिक परीक्षा एप्रिल - २०२१

## संभाषण

### गणपती बाप्पा

- गणपतीचा सण भाद्रपद महिन्यात येतो.
- गणपतीच्या मातीच्या मूर्तीची पूजा घरोघरी करतात.
- गणपतीला लाल फुले व दुर्वा आवडतात.
- एकवीस मोदकाचा प्रसाद करतात.
- अनंत चतुर्थीच्या दिवशी गणपतीचे विसर्जन करतात.

### माझे कुटुंब

- तुझ्या कुटुंबात कोण कोण राहतात ?
- तुझे भाऊ / बहीण काय करतात ?
- तुझी आई तुझ्यासाठी कोणता खाऊ करते ?
- तुझे बाबा तुला बागेत / बाहेर फिरायला घेऊन जातात का ?
- आजी / आजोबा तुला गोष्टी सांगतात का ?

## गोष्ट

### ससा आणि कासव

एक होता ससा आणि एक होता कासव. ते दोघे मित्र होते. दररोज फिरायला जायचे. ससा चालायचा तुरुतुरु, तर कासव चालायचे हळूहळू.

एके दिवशी सशाने कासवाला चिडवले. तो म्हणाला, “कासवा, तू किती रे हळू चालतोस ?

कासव म्हणाले, “लावतोस का माझ्याशी शर्यत ?”

ससा हसून म्हणाला “हो हो ! पण शर्यत मीच जिंकणार बघ.”

कासव म्हणाले, “ठीक आहे. ते दूर वडाचे झाड आहे ना, तिथपर्यंत धावायचे. जो अगोदर पोचेल, तो शर्यत जिंकेल.”

ससा म्हणाला, “कबूल”

शर्यत सुरु झाली. ससा जोरात धावू लागला. बघता बघता तो खूप पुढे गेला. त्याने मागे वळून पहिले. कासव खूप मागे होते. सशाने मनात म्हटले, थोडा आराम करावा.” मग तो एका झाडाखाली झोपला.

कासव कुठेही थांबले नाही. ते हळूहळू चालत सशाजवळ आले. ससा झोपलेलाच होता. कासव हसले, पण न थांबता चालत राहिले. लवकरच ते वडाच्या झाडाजवळ पोचले.

थोड्या वेळाने ससा जागा झाला. तो धूम पळत सुटला पण काहीही उपयोग झाला नाही. कासव वडाच्या झाडापाशी आधीच पोचले होते.

कासवाने शर्यत जिंकली. सशाची फजिती झाली.

### अभ्यास

तोंडी उत्तरे द्या :

१. कोण कोणात शर्यत लागली ?
२. ससा कोठे झोपला ? का ?
३. शर्यत कोणी जिंकली ?
४. ससा शर्यत का हरला ?

## बुडबुड घागरी

एक होते माकड, एक होती मांजर आणि एक होता उंदीर. त्या तिघांची फार गट्टी होती. एकदा त्यांनी खीर करायचे ठरवले. माकडाने पातेले आणले. उंदराने रवा आणि साखर आणली. मांजराने दुध आणले. सगळ्यांनी लाकडे गोळा केली. मांजराने चूल पेटवली. खीर तयार झाली. माकड आणि उंदीर दोघे नदीवर अंगोल करायला गेले. जाताना ते म्हणाले, मनी मावशी, तू खिरीची राखण कर."

मांजर राखण करायला थांबली. खिरीचा छान वास सुटला होता. मनीमाऊला भूकही लागली होती तिला वाटले, 'आपण थोडी खीर खाल्ली, तर कोणाला कळणार आहे ? म्हणून मनीमाऊने थोडी खीर खाल्ली. तिला खीर फर आवडली. मग मनीमाऊला राहवेना. तिने आणखी थोडी खीर खाल्ली. असे करता करता तिने सगळी खीर खाऊन टाकली. मग पातेल्यावर झाकण ठेऊन ती झोपेचे सोंग घेऊन बसली. काही वेळाने माकड आणि उंदीर आंघोळ करून आले. पाहतात तर काय, पातेले रिकामे. त्यांनी विचारले, "मनी मावशी, खीर कोणी खाल्ली ?"

मनीमाऊ म्हणाली, "मी नाही बाई खीर खाल्ली. मी तर झोपले होते." पण माकडाला संशय आला. त्याने एक घागर आणली. ते म्हणाले, ही घागर आपण नदीत उपडी ठेऊ. आळीपाळीने आपण त्या घागरीवर बसायचे आणि म्हणायचे, "मी खीर खाल्ली, तर बुडबुड घागरी." ज्याच्या वेळेस घागर बुडेल त्याने खीर खाल्ली असे ठरेल."

अगोदर माकड घागरीवर बसले. ते म्हणाले, "मी खीर खाल्ली असेल, तर बुडबुड घागरी." पण घागर बुडाली नाही. मग उंदीर घागरीवर बसला. तो म्हणाला, "मी खीर खाल्ली असेल, तर बुडबुड घागरी." पण घागर बुडाली नाही.

मग मनीमाऊ भीत भीत घागरीवर बसली. तिचे पाय लटलटू लागले. घागर हलू लागली. ती म्हणाली, "मी खीर खाल्ली, तर बुडबुड घागरी." हळूहळू घागर बुडू लागली. मनीमाऊ गटांगळ्या खाऊ लागली. घाबरून ती ओरडू लागली, "मला वाचवा ! मी परत खोटे बोलणार नाही. मित्रांना फसवणार नाही." अशी झाली मनीमाऊची फजिती !

### अभ्यास

१. चूक की बरोबर ते सांगा :

(१) मांजर नदीवर अंघोळीला गेली.

(२) मांजराने सगळी खीर खाल्ली.

(३) माकड झोपेचे सोंग घेऊन बसले.

(४) मांजर बसल्यावर घागर बुडाली.

**२. या गोष्टीपासून आपण काय शिकावे, त्या वाक्यासमोर अशी खूण ✔ करा.**

**अ) घागरीवर नेहमी बसावे** ☐

**आ) मित्रांनाकधीही फसवू नये** ☐

**इ) मित्रांना कधी कधी फसवावे.** ☐

## टोपीवाला आणि माकडे

एक होता सखाराम टोपीवाला. तो गावोगाव जात असे. "टोप्या घ्या हो, टोप्या असे ओरडत टोप्या विकत असे.

एकदा तो टोप्या विकायला निघाला वाटेत जंगल लागले. चालून चालून सखाराम दमला. एका झाडाखाली थांबला. टोप्यांची पेटी खाली ठेऊन तो तेथेच झोपला.

त्या झाडावर दोन माकडे होती. एका माकडाने खाली उडी मारली. त्याने पेटी उघडली पेटीतून एक टोपी काढली आणि आपल्या डोक्यावर ठेवली.

दुसरे माकड खाली आले. त्यानेही तसेच केले. मग तिथे आणखी माकडे आली. त्यांनी पेटीतून टोप्या काढल्या. त्या आपापल्या डोक्यांवर ठेवल्या. मग सर्व माकडे त्या झाडावर चढली आणि 'हुप हुप' 'हुप हुप' असे ओरडू लागली.

त्या गोंगाटाने सखाराम जागा झाला. बघतो तर पेटीत टोप्या नाहीत. त्याने वर पहिले झाडावर माकडेच माकडे होती. प्रत्येकाच्या डोक्यावर टोपी होती.

सखारामाने आपली काठी माकडांवर उगारली. माकडांनी लहान लहान फांद्या तोडल्या आणि सखारामवर उगारल्या.

आपण करतो तसेच माकडे करतात, हे सखारामच्या लक्षात आले. त्याने आपल्या डोक्यावरची टोपी काढून पेटीत फेकली. लगेच माकडांनीही आपल्या टोप्या काढून पेटीत फेकल्या.

सखारामला फार आनंद झाला. त्याला सगळ्या टोप्या परत मिळाल्या, सखाराम दुसऱ्या गावी जायला निघाला.

## अभ्यास

### १)तोंडी उत्तरे द्या

१. सखाराम काय विकत असे ?

२. टोप्या कोणी पळवल्या ?

३. सखारामला टोप्या परत कश्या मिळाल्या ?

२) या गोष्टीवरून काय लक्षात येते ते खालील वाक्यामधून बरोबर ओळखा व त्यावर ✔ अशी खुण करा :

१. माकडांना टोप्या घालणे आवडते.

२. माकडांना फांद्या उगारणे आवडते.

३. माकडांना नक्कल करणे आवडते.

## चल रे भोपळ्या, टुणूक टुणूक

एक होती म्हातारी. ती जात होती लेकीकडे. जंगलात तिला भेटला एक लांडगा. तो म्हणाला, “म्हातारे, म्हातारे, भूक लागली मला, मी खातो आता तुला.”

म्हातारी खूप धीट होती. ती म्हणाली, “माझ्यात खायला आहेच काय? नुसती हाडे ! लेकीकडे जाईन. चार दिवस राहीन. तूप-रोटी खाईन. जाडजूड होऊन येईन मग मला खा.”

लांडगा म्हणाला, “खरंच ग खरं ! पण लवकर ये हं. मी वाट पाहीन.”

म्हातारी पुढे निघाली. मग तिला भेटला एक वाघ. तो म्हणाला. “म्हातारे, खातो आता तुला.”

म्हातारी म्हणाली, “वाघोबा, माझ्यात खायला आहेच काय? नुसती हाडे ! लेकीकडे जाईन. चार दिवस राहीन. तूप-रोटी खाईन. जाडजूड होऊन येईन मग मला खा.”

वाघ म्हणाला, “बरं, बरं. पण लवकर परत ये हो !”

म्हातारी लेकीकडे गेली. थोडे दिवस राहिली. तूप-रोटी खाऊन जाडजूड झाली. मग लेकीला म्हणाली, “मुली, आता मी घरी जाते ग.”

लेक म्हणाली, “आई, आणखी चार दिवस राहा ना.”

म्हातारी म्हणाली, "नको ग बाई. जंगलात लांडगा माझी वाट बघतोय. वाघ माझी वाट बघतोय."

मुलीला आईची काळजी समजली. ती म्हणाली, "आई हा घे जादूचा मोठ्ठा भोपळा. त्यात बसून जा. म्हणजे तुला कोणी बघणार नाही."

म्हातारी भोपळ्यात बसली आणि म्हणाली, "चल रे भोपळ्या, टुणुक टुणुक." भोपळा पळत निघाला.

जंगलात भेटला वाघ. तो म्हणाला, "भोपळ्या, भोपळ्या, म्हातारीला पाहिलेस का रे ?" भोपळ्यातून म्हातारी म्हणाली, म्हातारीबितारी मला नाही ठाऊक. चल रे भोपळ्या, टुणुक टुणुक."

भोपळा जोरात पळत सुटला. वाघाला संशय आला. तोही भोपळ्याच्या मागे पळत सुटला. वाटेत भेटला लांडगा. त्याने भोपळ्याला अडवले. "म्हातारीला बाहेर काढले. मग म्हणाला, म्हातारे मला फसवतेस काय ? आता मी तुला खाणार." एवढ्यात वाघही तिथे आला. तो म्हणाला "मीच खाणार म्हातारीला." लांडगा म्हणाला, "मी खाणार." वाघ म्हणाला, "मी खाणार".

दोघांचे भांडण जुंपले. ते पाहून म्हातारी गुपचूप भोपळ्यात बसली आणि म्हणाली, "चल रे भोपळ्या, टुणुक टुणुक." वाघ आणि लांडगा भांडत बसले. म्हातारीचा जीव वाचला.

## अभ्यास

१) चूक की बरोबर ते खुणा करून लिहा.

(१) म्हातारी लेकीकडे जात होती.

(२) म्हातारी फार धीट होती.

(३) म्हातारीला वाटेत उंट भेटला.

(४) मुलीने आईला जादूचा भोपळा दिला.

(५) वाघाने म्हातारीला खाल्ले.

२) एक ते दोन शब्दात तोंडी उत्तरे द्या.

(१) म्हातारीला वाटेत कोण कोण भेटले ?

(२) म्हातारी कुठे  चालली होती ?

(३) मुलीने म्हातारीला काय दिले ?

(४) म्हातारी भोपळ्याला काय म्हणत असे ?

(५) वाघ व लांडगा का भांडत बसले ?

## लबाड कोल्हा

एक छोटा मुलगा होता.  त्याच्या हातात एक पुरी होती.

तिथे एक कावळा आला.  त्याने मुलाच्या हातातली पुरी पळवली.

कावळा एका झाडावर जाऊन बसला.  झाडाखाली एक कोल्हा होता.  त्याने कावळ्याच्या चोचेतील पुरी पहिली.  त्याच्या तोंडाला पाणी सुटले. पण पुरी मिळणार कशी ?

कोल्हा कावळ्याला म्हणाला,  " काऊ दादा,  तू किती छान दिसतोस!  तुझे पंख किती छान आहेत !  आणि तुझा आवाज पण किती गोड आहे रे !  मला एक गोड गाणे  म्हणून दाखव ना.”

कावळा भोला होता.  आपली स्तुती ऐकून तो खूष झाला.  त्याने गाण्यासाठी चोच उघडली. चोचीतील पुरी खाली पडली.  लबाड कोल्ह्याने चटकन पुरी उचलली आणि तो पळून गेला. बिचारा कावळा 'काव काव'  करत बसला.

### अभ्यास

१. एका शब्दात उत्तर सांगा.

(१) मुलाच्या हातात काय होते ?

(२) पुरी कोणी पळवली ?

(३) गाणे कोणी म्हटले?

२. चूक की बरोबर ते सांगा

(१) कावळा झाडाखाली बसला.  (२) कावळ्याचा  आवाज फार गोड होता.

(३) कोल्ह्याने  कावळ्याची स्तुती केली.  (४)  कावळा भोळा होता.

## कोल्हयाला द्राक्षे आंबट ( पाठांतर )

कोल्होबा एकदा सकाळी सकाळी फिरण्यासाठी बाहेर पडले. फिरून फिरून दमल्यामुळे कोल्होबांना खूप भूक लागली. फिरता फिरता त्याला शेतात द्राक्षांची बाग दिसली. पिकलेल्या द्राक्षांचा घड पाहून कोल्होबाच्या तोंडाला पाणी सुटले. द्राक्षांचा वेल उंच होता. द्राक्षे खाण्यासाठी कोल्होबांनी उड्या मारण्यास सुरवात केली.

खूप वेळ उड्या मारूनही उंचावरील द्राक्षे कोल्होबांच्या हाती आली नाहीत. अखेर कोल्होबा कंटाळले. द्राक्षे खायला मिळत नाहीत हे लक्षात आल्यावर कोल्होबा नाक - तोंड वाकडे करत मनातल्या मनात पुटपुटला - 'जाऊ दे ! नाहीतरी द्राक्षे आंबटच आहेत. अशी द्राक्षे खाऊन आपण आजारी पडू. तेव्हा ती न खाल्लेलीच बरी, असे म्हणून कोल्होबा तिथून निघून गेले.

शिक्षक व पालकांचे काम :

वैकासिक उद्दिष्टे : (१)लक्षपूर्वक एकण्याची सवय वाढीस लावणे (२)ऐकलेली गोष्ट पुन्हा सांगता येणे (३)घटनाक्रम सांगता येणे.

## माझा खाऊ मला द्या (श्रवण - प्रश्न उत्तरे)

बाईंचा गणिताचा तास संपला आणि मधली सुट्टी झाली. वर्गातल्या मुलांनी डबे उघडले आणि आईने दिलेला खाऊ फक्त केला. पण कुणी खेळायची साल, कुणी शेंगांची टरफले, बिस्किटांच्या पुड्याचा कागद, कुणी पोहे तर कुणी चिवडा तर कुणी वेफर्स असे खुप सारे पदार्थ वर्गात जमिनीवरच टाकून दिले. बाईंनी शाळेतल्या मावशींना बोलावून कचरा साफ करण्यास सांगितले. मावशी वर्गात येईपर्यंत मुले धावत सुटली व खेळण्यासाठी एकामागून एक वर्गाबाहेर पडली. तोच रोहनचा धक्का लागून प्रतिक पडला. गौरीचा पाय केळ्याच्या सालीवर पडला व ती घसरली. सर्वांच्या पायाला कचरा चिकटला व मुले पडू लागली. सारा वर्ग तेलकट व चिकट झाला. पडलेली मुले रडू लागली बाईंनी सर्वांना शांत राहण्यास सांगितले. नंतर कचऱ्याच्या डब्याकडे सर्व मुले बाईंच्या मागून गेली. त्यावर लिहिले होते, **“माझा खाऊ मला द्या.” इथे कचरा टाकायला पाहिजे खायला पाहिजे शाळा सुंदर राखायला पाहिजे**, असे म्हटल्यावर मुले टाळ्या वाजवून हसू लागली.

## शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ (पाठांतर)

लठ्ठ शामू आणि काठकुळा राम असे दोन जिवलग मित्र फिरायला जातात. फिरता फिरता एका जंगलात पोहोचतात. गुर गुर असा आवाज ऐकून दोघेही घाबरतात. स्वतःचा जीवन वाचविण्यासाठी लठ्ठू शामू झाडावर चढतो. बिचाऱ्या काटकुळया रामूला झाडावर चढता येत नाही. रामूला एक युक्ती सुचते. रामू जमिनीवर पडून राहतो व मेल्याचे सोंग करतो. अस्वल त्याच्याजवळ येते तो मेला आहे असे समजून निघून जाते. रामूने केलेल्या या युक्ती मुळे त्याचा जीव वाचतो.

तात्पर्य : शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ

उद्दिष्टे : १) गोष्टीचा क्रम    २) अभिनय व आवाजातील चढ-उतार

## छोटीशी चिमणी (पाठांतर)

एक होते जंगल त्या जंगलात खूप पक्षी होते. एक दिवस काय झालं ? त्या जंगलामध्ये एक पारधी आला. त्याला पक्ष्यांची चित्र शिकार करायची होती. त्याने एक जाळे आणले व सगळीकडे पसरवून ठेवलं आणि त्या जाळ्यावर सगळीकडे धान्य व दाणे पेरून ठेवले. दाणे पाहून एक चिमणी आली आणि जाळ्यामध्येच अडकली तिने घाबरून लगेच देव बाप्पाकडे धावा केला. ती म्हणाली “मी एकदा दाणा चोरला त्यासाठी मला एवढी मोठी शिक्षा !” मग देव म्हणाला, “चोरी छोटी असो की मोठी, आपल्या मनावर आपला ताबा हवा, मग हा प्रश्न कशाला हवा ?”

तात्पर्य - वाईट काम हे वाईटच असते.

# गाणी

| निळ्या रंगाचे गाणे | लाल रंगाचे गाणे |
| --- | --- |
| निळ्या रंगा, निळ्या रंगा, कुठे आहेस तू ?<br>उंच उंच आकाशी ढगांच्याही वर<br>निळ्या रंगा, निळ्या रंगा, कुठे आहेस तू ?<br>खोल खोल पाण्यामध्ये खूप खूप खोल<br>निळ्या रंगा, निळ्या रंगा, कुठे आहेस तू ?<br>आमच्या कपड्यात आहे तू ! | लाल रंगा असतो चेरीचा (२)<br>लाल रंगा असतो सफरचंदाचा<br>लाल रंगाची स्ट्रॉबेरी<br>लाल रंगाची जास्वंदी (३) |
| **हिरव्या रंगाचे गाणे**<br>पोपटा पोपटा तुझा रंग कोणता<br>हिरवा रंग माझा तुझा आवडता<br>सगळीकडे मैदानात पसरलंय कोण.....?<br>हिरवी हिरवी हिरवळ  आणखीन कोण......?<br>छोटी झाडे मोठी झाडे छोटे रोपटे<br>हिरवे हिरवे दिसे गोमटे .......! | **गुलाबी रंगाचे गाणे**<br>रंग गुलाबी असतो कुठे कुठे<br>छोट्याशा बाळाच्या गोबऱ्या गालामध्ये<br>छान छान फुलांमध्ये आवडीचे ते कोण<br>आवडीचे ते कोण ?<br>कमळाचे फूल गुलाबाचे फुल आणखी असणार कोण<br>ज्यूस सफरचंदाचे आईस्क्रीम फायद्याचे<br>किती किती छान ?<br>त्यात तू असतोस म्हणून<br>ठेवतो तुझा मान. |

## आभाळ वाजलं धडाम धूम

आभाळ वाजलं धडाम धूम
वारा सुटला सूम सूम
वीज चमकली चक चक चक
जिकडे तिकडे लख लख लख
पाऊस आला धो धो धो
पाणी वाहिले सो सो सो
पाण्यात बोट सोडली
हातभर जाऊन बुडली बुडली
बोटीवर बसला बेडूक दादा
तो ओरडला डराँव डराँव

## राखीचे गाणे

राखी बंधन, सुंदर बंधन,
प्यार प्यार हैं,
भाई को बहनसे, बहेन को भाईसे
प्यार प्यार हैं|
खूब सजीली राखी है, सुंदर प्यारी राखी हैं|
भाई को बहेन से बहेनको भाईसे
प्यार प्यार हैं|
भाई का बहेनका त्योहार हैं|

## काळ्या - पांढऱ्या रंगाचे गाणे

रंग रंग काळा रंग

रंग रंग पांढरा रंग, असतो कशाचा ?

काळ्या काळ्या कोळशाचा

आणि पांढऱ्या बगळ्याचा

मोठे मोठे  डोळे

दिसतात किती छान

काळ्या-पांढऱ्या रंगाचे

आमचे डोळे छान

दूध पांढऱ्या रंगाचे

केस काळ्या रंगाचे असतात हो कसे ?

झेब्रा प्राणी आहे त्यात

हे दोन्ही रंग वसे

## स्कूल इज ओव्हर

**स्कूल इज ओव्हर (२)**

**शॅल वी गो ?**

**वी विल कम टुमॉरो**

**बाय बाय नाऊ (३)**

**बाय - बाय**

## मछली जल कि राणी

मछली जल की रानी है |

जीवन उसका पानी है |

हात लगाओ तो डर जायेगी |

पानी से निकालो  तो मर जायेगी ||

## बारिश आयी छम छम

बारिश आयी छम छम छम |

लेकर निकले छाता हम |

पैर फिसल गये, गिर गये हम |

उपर छाता,  नीचे हम |

## पतंगाचे गाणे

छान छान पतंग

आभाळात जातो

निळ्या निळ्या ढगांनी तो भेट घेतो

काय त्याचा तोरा

आभाळात जाताना

नाच त्याचा देखणा

वारा गाणे गाताना

झुपकेदार शेपटी फर-फर करे

वर वर जाताना सर सर करे

संक्रांतीला त्याच्याशी खुप खुप खेळु

तीळ-गुळ देऊन आपण गोड गोड बोलु

## दहीहंडी

उंचावर बांधलीय दह्याची हंडी

फोडायला येतात मुलांच्या झुंडी

एकमेकांच्या हातात हात

तालावर नाचती गाणी गात

थरावर थर रचती अनेक

कोसळून पडती एकावर एक

भरभर परत वर चढती

नजर ठेवून हंडीवरती

एकजण पोचतो हंडीजवळ

हंडी फोडतो मारून नारळ

दह्या दुधाचा पाऊस पडतो

फेरा धरून गोविंद नाचतो.

| गणेशोत्सव | एक दोन तीनचे गाणे - छोटा शिशु |
|---|---|
| गणपती बाप्पा मोरया<br>आमच्या घरी लवकर या<br>तुमच्यासाठी रंगीत पाट<br>आरास आणि थाटमाट<br>सुपासारके कान तुमचे<br>सोंड किती लांब<br>लंबोदर हा उंदरावरती<br>शोभे किती छान<br>पूजेसाठी दुर्वा फुले<br>आरतीसाठी जमली मुले<br>नैवेद्याला मोदक केले<br>गणपती बाप्पा खुश झाले<br>गणपती बाप्पा मोरया! | आम्ही शिकलो एक<br>एक एक एक<br>आईने केला<br>चॉकलेटचा केक!<br><br>आम्ही शिकलो दोन<br>दोन दोन दोन<br>बाबांनी आणला<br>आईस्क्रीमचा कोन!<br><br>आम्ही शिकलो तीन<br><br>तीन तीन तीन<br>काकांना आणला<br>चावीचा पेंग्वीन!<br><br>आम्ही शिकलो चार<br>चार चार चार<br>आईने आणला<br>मिल्की बार!<br><br>आम्ही शिकलो पाच<br>पाच पाच पाच<br>ताईने शिकवला<br>छान छान नाच! |

## पिवळ्या रंगाचे गाणे

पिवळा रंग कोणाचा पिवळा रंग कशाचा कोणा- कोणाचा...? कशा - कशाचा...? छान छान सूर्यफूल, आंबट लिंबाचा, पाहा पाहा आला कोण रंग पिवळा घेऊन फळांचा तो राजा आंबा दिसे कसा शोभून......! फुलांवरून फिरणारं, टकामाका बघणारं असतं तरी कोणं मध गोळा करणारं फुलपाखरू ते गोड.....!

## निसर्गपूजा

जयदेव, जयदेव निसर्ग देवा
तुमचा महिमा आम्ही किती सांगावा ||धृ||
चंद्र - सूर्य आम्हा प्रकाश देती
सागर - सरीता जीवन देती
शेतामध्ये जणू मोती पिकती
आम्ही सारे तुमची करू आरती
जयदेव, जयदेव निसर्गदेवा ||१||
वस्त्रासाठी आम्हा मिळे कापूस
फळाफुलांचा छान सुवास

## अक्कण माती चिक्कण माती

अक्कण माती चिक्कण माती खळगा जो खणाचा

अस्सा खळगा सुरेख बाई, जात ते रोवावं

अस्सं जातं सुरेख बाई, रवा पिठी काढावी

अश्शी रवा पिठी सुरेख बाई, करंज्या कराव्या

अशा करंज्या सुरेख बाई, तबकी भराव्या

अस्सा तबक सुरेख बाई, पालखीने ठेवावा

अशी पालखी सुरेख बाई, माहेरा धाडावी

अस्सं माहेर सुरेख बाई, खायला मिळतं

अस्सं सासर द्वाड बाई, कोंडीनी मारीतं
अस्सं आजोळ गोड बाई, खेळायला मिळतं

## नाशिकची द्राक्षे

नाशिकची द्राक्षे गोडच गोड

नागपूरच्या संत्र्याची छानदार फोड

वसईच्या केळ्याचा मोठा मान

केळ्याची शिकरण लागते छान

पनवेलचे कलिंगड लालच लाल

खाऊन पहाल तर खुषच व्हाल

अहमदाबादची बोर हिरवी गार

ल्य ल्य सस्ती पैशाचा चार

पुरे बाबा पुरे बाबा तुम्ही थांबा

फळांचा राजा मी आंबा

# CONVERSATION JR.KG.

## JULY

## (Question & Answer)

1. **Who are you ?**

**Ans. I Am a ______________________**

2. **What is your name ?**

**Ans. My name is ______________________**

3. **How old are you ?**

**Ans. I am __________ years old.**

4. **Where do you live ?**

**Ans. I live in Vikhroli.**

## AUGUST

## A Ball

1. **What is this ?**

**Ans. This is a ball.**

2. **What is the colour of the ball ?**

**Ans. The colour of the ball is blue.**

3. **What do you do with the ball ?**

**Ans. I play with the ball.**

4. **Do you like the ball ?**

**Ans. I like the ball.**

## SEPTEMBER

## A Bus

**1. What is this ?**

**Ans. This is a bus.**

**2. What is the colour of the bus ?**

**Ans. The colour of the ball is red.**

**3. Who drives the bus ?**

**Ans. The driver drives the bus.**

**4. Who gives the ticket ?**

**Ans. The conductor gives the ticket.**

## NOVEMBER

## A Bus

**1. When does diwali come ?**

**Ans. Diwali comes in October or November.**

**2. What festival is diwali ?**

**Ans. Diwali is a festival of light.**

**3. What do you do in Diwali?**

**Ans. In diwali we make sweets, light crackers and lamps.**

## DECEMBER

## A Mango

1. **What is this ?**

**Ans. This is mango.**

2. **What is the colour of mango ?**

**Ans. The colour of the mango is yellow.**

3. **What is the taste of a mango?**

**Ans. The taste of mango is sweet.**

4. **Do you like the mango ?**

**Ans. Yes, I like mango.**

## JANUARY

## My Pet

1. **What is this ?**

**Ans. This is my pet dog.**

2. **What is his name ?**

**Ans. His name is Tommy.**

3. **What does he eat?**

**Ans. He eats meat and bones.**

4. **What does he do ?**

**Ans. He guards our house.**

5. **How does the dog barks ?**

**Ans. The dog barks bow-bow.**

## FEBRUARY

## Cow

1. **What is this ?**

**Ans. This is a cow.**

2. **What does the cow eat ?**

**Ans. The cow eat grass.**

3. **What does the cow give us ?**

**Ans. The cow gives us milk.**

4. **Where do cow live ?**

**Ans. Cow live in cowshed.**

5. **How many horns does the cow  ?**

**Ans. The cow has two horns.**

# इंग्रजी गाणी

| **जॉनी जॉनी** | **टेडी बिअर,टेडी बिअर** |
|---|---|
| येस पापा | टर्न अराऊँड |
| इटिंग शुगर, नो पापा | टेडी बिअर, टेडी बिअर |
| टेलींग लाइज, नो पापा | टच द ग्राऊंड |
| ओपन युवर माउथ | टेडी बिअर, टेडी बिअर |
| हा हा हा | पॉलिश युवर शुज |
| | टेडी बिअर,टेडी बिअर |
| | ऑफ टू स्कूल |

**व्टिंकल व्टिंकल**

लिटील स्टार,

हाऊ आय वंडर

वॉट यु आर

अप अबाउ द वर्ल्ड सो हाय

लाईक अ डायमंड

इंन द स्काय

व्हेन द प्लिजिंग सन हॅज गॉन

व्हेन देअर इज नथिंग

शाइन इन द पॉन्ड

देन यू शो युअर लिटिल स्टार

व्टिंकल व्टिंकल ऑल द नाइट.

# Story

## The Thirsty crow

It was a hot summers day. A crow was very thirsty. He looked for water here and there but could not find any water. At last he saw a pot of water with very little water inside. He thought of a plan then he collected stones from nearby and dropped them into the pot, one by one.

The water came up. The crow drank the water and flew away happily.

Moral:-We should use our common sense

## Fox and The Grapes

One day, a fox saw a bunch of grapes hanging from a plant. He wanted the grapes. So he jumped and jumped again, but he could not get the grapes.

So he went away saying, "The grapes are sour".

## Two Silly Goats.

Two goats were trying to cross the river. Both of them met in the middle of the river. The bridge was so narrow that they could not cross the river. Each of them wanted to cross the river first. The silly goats, begin to fight. Both of them fell in the river and were drowned.

## Greedy Dog

Once a dog was crossing a bridge with a bone in his mouth. He looked into the water and saw another dog with a bone. He wanted that bone too. So he started barking “bow, bow, bow, bow, ". Doing so his own bone fell into the water, now he had no bone. He learnt never to be Greedy again.

## विद्या विकास एज्युकेशन सोसायटी, विक्रोळी स्थापना वर्ष - १९६२

### उत्तम व दर्जेदार आणि संस्कारक्षम शिक्षणाची हमी



**अध्यक्ष मान.प.म.राऊत**

**राष्ट्रीय शिक्षक कल्याण पुरस्कार १९९१**

**राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार १९९४**

**कै.सौ.मान.विद्या प.राऊत**

**राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २००१**

**विश्वस्त, सी.ई.ओ.वि.वि.एज्युकेशन सोसायटी, विक्रोळी**

**अध्यक्षा, स्वामी शामानंद एज्युकेशन सोसायटी, घाटकोपर**

**चिटणीस डॉ.विनय प. राऊत**

**आदर्श शिक्षण संस्था पुरस्कार-२००६**

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श शिक्षक पुरस्कार-२०२०**

**विद्यार्थी संख्या - ११,२५०** **कार्यरत शाळा- १९** **शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी- ४६८**

| अ.क्र. | संस्थेचे शाळा व कॉलेज विभाग |
|---|---|
| १ | विकास हायस्कूल शिशु विभाग (इंग्रजी व मराठी माध्यम) विक्रोळी आणि पवई |
| २ | विकास हायस्कूल प्राथमिक विभाग (मराठी व सेमी इंग्रजी माध्यम) |
| ३ | विकास हायस्कूल प्राथमिक विभाग (इंग्रजी माध्यम) |
| ४ | विकास हायस्कूल आणि टेक्निकल विभाग (मराठी व सेमी इंग्रजी माध्यम/ ISO ९००१:२०१५ प्रमाणित) |
| ५ | विकास हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय (ISO ९००१:२०१५ प्रमाणित) |
| ६ | विकास रात्र शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय (ISO ९००१:२०१५ प्रमाणित) |
| ७ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालय, (कायम विना अनुदानित, इंग्रजी माध्यम) (ISO ९००१:२०१५ प्रमाणित) |
| ८ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालय, (कायम विना अनुदानित, इंग्रजी माध्यम) (ISO ९००१:२०१५ प्रमाणित) |
| ९ | विकास कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स (नॅक 'अ' श्रेणी मुल्यांकित/ ISO ९००१:२००१५ प्रमाणित) बी.ए./बी.कॉम./बी.कॉम.(अकाऊंटस् आणि फायनान्स) एम.कॉम. (ॲडव्हान्स अकाऊंटिंग आणि बिझिनेस मॅनेजमेंट)/ बी.एम.एस. / बी.एस.सी / बी.एस.सी.आय.टी./ बी.एस.सी.कॉम्प्युटर सायन्स/ बी.एस.सी.बायोटेक,/ बी.व्होक मिडिया प्रॉडक्शन / बी.व्होक / बी.व्होक मेडीकल लॅबोरेटरी टेक्नॉलॉजी / एम.एस.सी.ऑरगेनिक केमेस्ट्री/ एम.एस.सी.बायोटेक/एम.एस.सी.आय.टी./ एम.कॉम. / पी.एच.डी. (कॉमर्स) |
| १० | यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठाचे अभ्यास केंद्र (बी.ए.,बी.कॉम.,एम.बी.ए) अ श्रेणी मुल्यांकित |
| ११ | विकास कॉलेज इन्फोर्मेशन सेंटर : टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे (बी.सी.ए. / बी.बी.ए./ एम.सी.ए.) |
| १२ | श्रीमती दुर्गाताई पाटोळे शिशु मंदिर, विद्या विकास प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा आणि उच्च माध्यमिक शाळा, वांगणी, जि.ठाणे (ISO ९००१:२०१५ प्रमाणित) |
| १३ | विद्या विकास नाईट हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय, रमाबाई नगर, घाटकोपर (पूर्व) |
| १४ | स्वामी शामानंद हायस्कूल शिशु विभाग आणि प्राथमिक विभाग, बर्वेनगर, घाटकोपर मराठी व सेमी इंग्रजी माध्यम (विना अनुदानित) |
| १५ | स्वामी शामानंद हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय (विना अनुदानित) माणिकलाल कंपाऊंड, घाटकोपर |
| १६ | स्वामी शामानंद नाईट हायस्कूल(अनुदानित) आणि कनिष्ठ महाविद्यालय (विना अनुदानित) घाटकोपर |
| १७ | मातोश्री पार्वती राऊत विद्यालय (पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक विभाग इंग्रजी माध्यम / स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर) मु.पो.. रेडी, ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग |
| १८ | डॉ.वा.शं.मटकर संगीत विद्यालय, अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ मान्यता प्राप्त |
| | • उपक्रम :- विकास स्पोर्ट्स अकॅडमी (कराटे / जिमनॅस्टीक / कब्बडी / क्रिकेट ) |

# शालेय सोयी सुविधा







**आधुनिक प्रयोगशाळा** **पुस्तकांनी समृद्ध प्रशस्त ग्रंथालय** **सुसज्य संगणक कक्ष, प्रोजेक्टर, ई-लर्निंग**

**आमची वैशिष्टये :** १) दिवसा काम करुन शिक्षण पूर्ण करण्याची इच्छा असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी रात्रशाळा व ज्यु. कॉलेज २) नर्सरी, पूर्वप्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक शाळा - सेमी इंग्रजी माध्यम ३ ) वैविध्यपूर्ण अभ्यास पूरक उपक्रम ४) बनी टमटोला (सर्व प्राथ.विभाग), कब-बुलबुल (प्राथ.विभाग), स्काऊट-गाईड (माध्य. विभाग) ५) अभ्यासक्रमाचे संगणक व प्रोजेक्टरव्दारे अध्यापन व अध्ययन ६)विद्यार्थ्यांच्या अभ्यास व वर्तन समस्यांसाठी समुपदेशकांकडून विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन ७) विद्यार्थ्यांची नियमित आरोग्य तपासणी ८) पालक संपर्क व सुसंवाद (पालकसभा व गृहभेटी) ९) माता-पालक संघ व पालक-शिक्षक संघ १०) इयत्ता ४ती ते ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी पोषक आहार ११) प्रशिक्षित, अनुभवी, तज्ज्ञ, क्रियाशील व विद्यार्थीहित जपणारा शिक्षकवर्ग १२) इयत्ता १०वी व १२वी परीक्षेचा निकाल सतत ९८ टक्के पेक्षा जास्त १३) रात्रशाळा इ.८ वी ते १०वी विद्यार्थ्यांना 'मासूम' या सेवाभावी संस्थेकडून मोफत वह्नया व क्रमिक पुस्तके, विज्ञान प्रयोगशाळा साहित्य व संगणक इ.भेट १४) 'मासूम' संस्थेव्दारा विद्यार्थ्यांना तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन व शिक्षकांना प्रशिक्षण १५) तसेच इ.८वी ते १०वी रात्रशाळा विद्यार्थ्यांना अल्पोपहार १६) तंत्रस्नेही (डिजिटल) शाळा १७) उपक्रमशील शाळा

## पूर्व प्राथमिक शाळा, प्राथमिक शाळा आणि माध्यमिक शाळा अभिनव उपक्रम:

१) ज्ञानरचनावादानुसार अध्ययन अध्यापन २) संगणक अभ्यासक्रम व आय.टी.चॅम्प ल्पर्धाचे आयोजन ३) इयत्ता १०वी व १२वी बोर्ड परीक्षेकरीता तयारीसाठी अभ्यास शिबीरात प्रश्नपत्रिका संच सराव, ४) संस्कारक्षम परिपाठ ५) शिष्यवृत्ती मार्गदर्शन ६) अप्रगत विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन ७) इंग्रजी संभाषण उपक्रम ८) आंतरशालेय आणि स्पर्धात्मक परीक्षा सहभाग ९) टिळक विद्यापीठ परीक्षा/प्रज्ञाशोध परीक्षा १०) होमी भाभा बाल वैज्ञानिक परीक्षा ११) आंतरशालेय क्रीडा स्पर्धा साभाग१२) विविध सांस्कृतिक व विद्यार्थी गुणदर्शन उपक्रम १३) विद्यार्थी व शिक्षक गुणगौरव १४) राष्ट्रीय उत्सव व सणांचे महत्व १५) वॉर्ड स्तरीय विज्ञान प्रदर्शनातून सहभाग १६) ग्रंथप्रदर्शन व 'कलादर्पण' कलाप्रदर्शन सहभाग १) स्काऊट-गाईड विद्यार्थी शिबीर आयोजन १८) माजी विद्यार्थी संघ स्थापना - मराठी शाळा वाचवा अभियान






**प्रवेश प्रक्रिया संबंधित संपर्क**

शिशु विभाग पर्यवेक्षक: **श्रीम. दिपा हुदलीकर**

प्राथमिक विभाग मुख्याध्यापिका: **श्रीम. अनामिका पाटील (२५०१०५७७)**

माध्यमिक विभाग व जुनिअर कॉलेज मुख्याध्यापक: **श्री. रविंद्र भांडारकर (८६५२७७६१९८)**

विश्वस्त: **श्रीम.मनिषा शिंदे (९८७०१९१२१२)**

**प्रवेश घेण्याची वेळ: सकाळी ९.०० ते सायं. ४.०० वा.**

**मान. श्री. प. म. राऊत, चिटणीस**